# सोपे मास्क

कोरोना विषाणू हा थेंबांच्या माध्यमातून श्वासनालिकेत प्रवेश करू शकतो. या संसर्गाची शक्यता मास्कमुळे कमी होते. जुन्या बनियान / टी-शर्टचे मास्क बनवण्याच्या या सोप्या पद्धतीत शिलाईची आवश्यकता नाही, पण यामुळे किमान संरक्षण मिळू शकते. आपण अशा घरगुती मास्कचा वापर केला तर, मर्यादित साठा असलेले सर्जिकल मास्क व एन-९५ श्वसनयंत्रे ही डॉक्टर व आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांना उपलब्ध होऊ शकतील.

## १



जुनी बनियान किंवा टी-शर्ट घ्या. एका बनियान पासून आपण दोन मास्क बनवू शकतो.

## २



11 x 9* इंचचा आयत आणि बांधण्यासाठी दोन पट्ट्या कापा.

* मुलांसाठी लहान आयत कापा.

## ३




आयताच्या मध्यभागी घडी घाला.

## ४



वर आणि खाली घडी घाला, आणि चार चिरा (स्लिट) कापा.

**वापरण्याच्या सूचना:**

(१) निर्जंतुक केल्याशिवाय मास्क पुन्हा वापरू नये. दोन मास्क तयार करा. यामुळे एक मास्क वाळत असतांना आपण दुसरा वापरू शकता. मास्क ओला झाले असल्यास दुसरा मास्क वापरा.
(२) मास्क काढतांना बाहेरच्या भागाला स्पर्श करू नका, मागच्या पट्ट्यासह तो काढा. आधी वरची पट्टी सोडा मग खालची पट्टी काढा.
(३) काढून टाकल्यानंतर हात स्वच्छ धुवा आणि गरम साबण्याच्या पाण्यात मास्क व्यवस्थित धुवा, आणि उन्हात वाळवा (जमल्यास इस्त्री करा) योग्य रित्या धुतल्यानंतर मास्क पुन्हा वापरता येतील.
(४) गाळण्याची क्षमता वाढविण्यासाठी, आपण घड्यांमध्ये कागद, रुमाल किंवा कपड्याचा थर घालू शकता.

## ५




स्लिट्समध्ये एका टोकापासून पट्टी घाला आणि दुसऱ्या टोकापासून खेचा.

## ६



चेहऱ्या अनुसार पट्ट्यांची लांबी अड्जस्ट करा. आपला मास्क वापरासाठी तयार आहे.

## ७



आकृतीत दाखविल्याप्रमाणे आपल्या चेहेऱ्यावर मास्क बांधा. पहिले वरची पट्टी आणि नंतर खालची पट्टी बांधा.

## ८



बाजूला मोकळी जागा नसल्याची खात्री करा व मास्क चेहेऱ्यावर नीट बसत आहे हे निश्चित करा.

**लक्षात घ्या की हे मास्क, एन-९५ सारख्या व्यावसायिक उपकरणांना पर्याय नाहीत.**
तरीही, सूती टी-शर्टच्या (होजरी) कपड्यापासून प्रभावी मास्क बनवता येतात असे पुरावे आहेत आणि अगदी किमान संरक्षणामुळे देखील विषाणूचा प्रसार नियंत्रित करण्यात महत्त्वपूर्ण फरक पडतो.
तपशीलांसाठी संदर्भ पहाः
tinyurl.com/cottonmask1,
tinyurl.com/cottonmask2 आणि
tinyurl.com/PSAIndiamask

tifr Homi Bhabha Centre for Science Education